पालखी सोहळा

# पाऊले चालती पंढरीची वाट...
# संतश्रेष्ठ श्री ज्ञानेश्वर महाराज

**माझे जीवाची आवडी।**
**पंढरपुरा नेईन गुढी ।।**
**पांडुरंगी मन रंगले ।**
**गोविंदाचे गुणी वेधीले ।।**

सन १९७२ नंतर महाराष्ट्राच्या गावात दुष्काळ पडलेला. बळी राजाची शिवारे भकास, पाण्याची वणवण, जनावरांचे हाल अशा परिस्थितीत आपला बळीराजा वैशाखाच्या उन्हाचे चटके झेलत, घामाच्या धारा पुसत वारकरी आपली शेतीची कामे पटापट उरकत वरुण राजाची वाट चातकाप्रमाणे पहात असतो. त्याला वेध लागलेले असतात ते पंढरीच्या वारीचे.

**सुखालागी करिसी तळमळ ।**
**तरी तू पंढरीसी जाय एकवेळ ।**
**चंद्रभागेकरिता स्नान ।**
**तुझे दोष पळती रानोरान ।।**

संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर माऊलीच्या चांदीच्या रथाची पांढरीशुभ्र ६ फूट उंच तरणीबांड रिवल्लारी बैलजोडी सोबत रानवडे



माऊलींच्या पालखी सोहळ्याच्या रथासाठी यंदा श्रीक्षेत्र आळंदी ग्रामस्थांच्या बैल समितीने आळंदी पंचक्रोशीतील आदर्श सधन शेतकरी पंडित कृष्णाजी रानवडे परिवारास बैलजोडी देऊन सेवा करण्याची संधी दिली आहे. ही बैलजोडी रत्नपारखी ग्रामस्थ व रानवडे परिवाराने कर्नाटक येथून चार लाख रुपयास आणली आहे. दोन्ही जनावरे पांढरीशुभ्र व सहा फूट उंच असून तरण्याबांड उमद्या खिल्लारी जोडीमुळे माऊलींच्या रथाची शोभा आणखीनच वाढणार आहे.

ह.भ.प. श्रीगुरु हैबतराव बाबा आरफळकर यांनी सुरू केलेला हा पालखी सोहळा आज मितीपर्यंत सुरू आहे. शतकोत्तर ८७ वे वर्ष साजरे करीत आहे. पालखीतून माऊलींच्या पादुका नेण्याची व्यवस्था त्यांनी केली. तत्कालीन औंध संस्थानचे प्रतिनिधी यांच्याकडून पालखीबरोबर येण्यासाठी हत्ती, घोडे मागून घेतले. कित्येक वर्षे हा सर्व लवाजमा पालखीबरोबर येत असे. पुढे हा लवाजमा येण्याचे बंद झाले म्हणून गुरु हैबतराव बाबा आरफळकर यांनी दुसरी व्यवस्था केली. त्यांनी ग्वाल्हेरच्या शिंदे सरकारकडे चाकरीस असताना त्यांचे सहकारी बेळगाव जिल्ह्यातील अंकली गावचे श्रीमंत सरदार शितोळे यांच्याकडून दोन घोडे तंबू मागून घेतला. जरीपटका घेतलेला एक घोडेस्वार आणि श्री ज्ञानेश्वर महाराजांसाठी दुसरा उमदा घोडा. या दुसऱ्या घोड्यावर ज्ञानेश्वर माऊली बसली आहे असे श्रद्धाळू वारकऱ्यांना वाटत असे. म्हणून प्रत्येक मुक्कामी आणि पालखीच्या वाटेवर माऊलींचे भक्त या दोन्ही घोड्यांचे दर्शन घेत असतात.

**माऊलींचा नवा रथ**

यावर्षी श्री ज्ञानेश्वर महाराज संस्थानने पालखी सोहळ्यासाठी चांदीच्या रथाची व्यवस्था केली आहे. हा नवीन रथ अप्रतिम, सुंदर व जास्तीत जास्त सुबक करण्याचा प्रयत्न केला आहे. या रथाची उंची सुमारे १३ फूट आहे. असे योगेश देसाई संस्थानचे विश्वस्त, पालखी सोहळा प्रमुख यांचे सांगणे आहे.

**माऊलींच्या पालखीसोबत नवा अश्व त्यावर चांदीचे सिंहासन**

कर्नाटक राज्यातील बेळगाव जिल्ह्यातील अंकली येथील श्रीमंत महाराज ऊर्जितसिंह शितोळेसरकार यांनी माऊलींच्या पालखीसोहळ्यासाठी काठेवाडी पठडीतील पंचकल्याणी जातीचा सहा फूट पाच इंच उंचीचा तरणाबांड तपकिरी रंगाचा नवीन हिरा अश्व पाठविला असून त्यास प्रशिक्षित करण्यात आलेले आहे. यंदा माऊलींच्या अश्वावर चांदीचे सिंहासन ठेवण्यात येणार आहे. हे सिंहासन कमी वजनात मजबूत बनविले आहे. त्या अश्वावर खोळ (जीन) त्यावर सुंदर चांदीची गादी, मागे आकर्षक प्रभावळ आणि वर छत्री अशी या सिंहासनाची रचना असून त्यात माऊली भक्तांना दर्शनासाठी पारंपारिक मूर्ती दिसणार आहे.



श्री ज्ञानेश्वर महाराज
संजीवन समाधी

**माऊलींची पालखी**

माऊलींच्या चांदीच्या पादुका ठेवण्यासाठी देवस्थानची सुंदर भक्कम पालखी असते. पालखीमध्ये गजनीची बैठक घालून त्यावर माऊलींच्या चांदीच्या पादुका वारीसाठी ठेवलेल्या असतात. पालखीच्या मागच्या पुढच्या दांड्यांना चांदीची सिंहमुखाची झाकणे असतात. एक जरीपटका निशाण, सुंदर, अबदागिरी, जरीबुट्टीची रंगीत छत्री, चांदीची चवरी पालखी बरोबर असते. असे हे भागवत धर्माच्या ज्ञानराज माऊलींचे वैभव वारीत नजरेत भरते.

**पालखी सोहळ्यासाठी शुद्ध पाणी**

श्री ज्ञानेश्वर महाराज संस्थानने वारीसाठी येणाऱ्या वारकऱ्यांसाठी पिण्याच्या पाण्याची चांगली सोय केली आहे. आळंदी नगरपरिषदेवर स्वच्छ पिण्याच्या पाण्याचा ताण पडू नये म्हणून महाद्वारमार्ग येथील काळामारुती चौक, बाजारपेठेतील भक्त निवास आणि सिद्धबेट मार्गावरील ज्ञानेश्वर बागेत नवीन यंत्रणा बसवून घेतली असून त्यामुळे वारीला येणाऱ्या वारकऱ्यांना चांगलाच लाभ होणार आहे, असे देवस्थानचे व्यवस्थापक श्रीधर सरनाईक व माऊली वीर आणि पालखी सोहळा प्रमुख योगेश व देसाई यांनी सांगितले.



**प्रस्थानाचा दिवस**

प्रस्थानाचा म्हणजे श्री ज्ञानेश्वर माऊली पंढरीच्या पांडुरंगास भेटण्यासाठी निघणार तो दिवस म्हणजेच ज्येष्ठ वद्य अष्टमी मंगळवार २५ जून २०१९ या दिवशी प्रस्थानाचा मंगलमय कार्यक्रम दुपारी ४ वाजता सुरू होईल. सर्वप्रथम हैबतरावबाबा यांचे वंशज बाळासाहेब पवार (मालक) आरफळकर हे माऊलींचे घोडे आणून आरती करतील. नंतर श्री ज्ञानेश्वर महाराज संस्थानचे विश्वस्त अभय टिळक - पालखी सोहळा प्रमुख ॲड. विकास ढगे पाटील, विश्वस्त डॉ. अजित कुलकर्णी, डॉ. नरेंद्र वैद्य, लक्ष्मीकांत देशमुख, योगेश देसाई हे पूजा व आरती करतील. यावेळी आळंदी नगरपरिषदेच्या अध्यक्षा वैजयंताताई उमरगेकर, प्रशासकिय अधिकारी, नगरसेवक, यात्रा कमिटीचे सदस्य, जिल्हाधिकारी, तहसिलदार व देवस्थानचे विश्वस्त, मानकरी, दिंडी प्रमुख समाजातील प्रतिष्ठित मंडळींना संस्थान श्रीफळ, प्रसाद हार देतील. ज्याच्या पूर्वजांनी माऊलींची इमाने इतबारे सेवा केली अशा सेवेकऱ्यांना मानाचे पागोटे देवस्थानाकडून बांधण्यात येतील. यावेळी श्रीक्षेत्र पंढरपूर येथील प्रतिष्ठित बडवे मंडळी उपस्थित असतील.

**प्रकाश पांडुरंग भालेकर**
मलबार हिल 9004894018

| वारीतील उभे रिंगण |
| --- |
| १) चांदोबाचा लिंब - ३ जुलै २०१९ |
| २) बाजीरावाची विहिर-१० जुलै २०१९ |
| ३) पादुका जवळ - ११ जुलै २०१९ |

| वारीतील गोल रिंगण |
| --- |
| १) पुरंदवडे - ७ जुलै २०१९ |
| २) खुडुसफाटा - ८ जुलै २०१९ |
| ३) ठाकूरबुवाची समाधी-९ जुलै २०१९ |
| ४) बाजीरावाची विहिर-१० जुलै २०१९ |

# पिलाणवाडी जलाशय आटत चालल्याने पाणीपुरवठा योजना अडचणीत

■ पुणे

**पुरंदर** तालुक्यामधील पिलाणवाडी जलाशयातील पाणीसाठा कमी झाल्यामुळे शिवरी प्रादेशिक नळ पाणीपुरवठा योजना अडचणीत आली आहे. या योजनेवर अवलंबून असलेले शिवरी, खळद, वाळुंज, निळुंज, एखतपूर, मुंजवडी, तक्रारवाडी, साकुर्डे, बेलसर या गावांना तीव्र पाणीटंचाईला सामोरे जावे लागत आहे.

पिलाणवाडी जलाशयांमध्ये सध्या अतिशय कमी पाणीसाठा असून, तो दुर्गंधीयुक्त झाला आहे. हा पाणीसाठाही शिवरी प्रादेशिक योजनेच्या जॅकवेलपासून जवळपास शंभर ते दीडशे फूट लांब असून त्या ठिकाणाहून उचलून तो जॅकवेलच्या कडेला सोडला जातो. येथून जवळपास ४१ हॉर्सपॉवरच्या पंपाने पाणी शिवरी प्रादेशिकच्या फिल्टर प्लाण्टमध्ये सोडले जाते. मात्र, प्रत्यक्षात तीन हॉर्सपॉवरपेक्षाही कमी पाणी शिवरी फिल्टर प्लाण्टमध्ये पोहोचते. यामुळे या योजनेच्या लाभार्थी गावांमध्ये सध्या आठ ते दहा दिवसांनी पाणीपुरवठा होत आहे, तर याच गावच्या वाड्या-वस्त्यांना जवळपास १४ ते १५ दिवसांनी पाणीपुरवठा होत आहे.

# बेपत्ता चिमुरड्याचा सापडला मृतदेह



**चाकण-** नाणेकरवाडी (चाकण, ता. खेड) येथून काल सायंकाळी ६ वाजण्याच्या सुमारास बेपत्ता झालेल्या चिकू मिथुन राठोड (२) या चिमुकल्याचा मृतदेह आज सकाळी एका बंगल्याच्या जिन्याखालील पाण्याच्या टाकीत आढळल्याने खळबळ उडाली आहे. या टाकीच्या जवळ सापडलेल्या लहान मुलाच्या चपलेवरून शोध घेतला असता ही धक्कादायक घटना समोर आली. या प्रकरणी चिकुचे वडील मिथुन शेषराव राठोड यांनी काल रात्री उशिरा पोलिसांत चिकूचे अपहरण झाल्याची फिर्याद दिली होती. चाकण पोलीस तपास करीत असतानाच आज सकाळी चिकूचा मृतदेह हाती लागला.



मुंबादेवी विधानसभा मनसे प्रभाग क्र. २१३ येथे राज ठाकरे यांच्या वाढदिवसानिमित्त गरजू, ज्येष्ठ नागरिकांसाठी मोफत छत्रीवाटप कार्यक्रम मोठ्या उत्साहात पार पडला. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून मनसे महिला सरचिटणीस रिटाताई गुप्ता, उपाध्यक्ष अरविंद गावडे, मलबार हिल विभाग अध्यक्ष धनराज नाईक, सरोज बाबर, किरण कदम उपस्थित होते. कार्यक्रमाचे आयोजन विभाग अध्यक्ष केशव मुळे यांच्या मार्गदर्शनाखाली उपविभाग अध्यक्ष विनोद अरगिले, शाखा अध्यक्ष सतीश लाड, महिला शाखा अध्यक्षा दिपिका बाबर यांनी केले होते. कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी वाहतूक सेनेचे उपाध्यक्ष प्रशांत गांधी, उपचिटणीस राजेश अरगिले, शाखा अध्यक्ष राजेश बनसोडे यांच्यासह उपशाखा अध्यक्ष लक्ष्मीकांत मॅकेल, अरुण आचार्य, रूकेश गिरोल्ला, हमिद माहिमतुले, नविन सोनी, मनोज दळवी, सुरेश अंकम, राकेश पटेल, वैभव मुरकर, प्रकाश रायकवाड, ज्ञानेश्वर शिंदे, प्रकाश रौंदळ, प्रेमा छावरिया, व्यंकटेश देवाणी, श्रीकांत चुन्नम, नागराज कोंडेरू, शेखर गाजुल्ला, संतोष गाजुल्ला यांनी विशेष मेहनत घेतली.

# जळगावच्या २४७ गावात अद्याप टँकरने पाणीपुरवठा

■ जळगाव, प्रतिनिधी

**जून** महिना जवळपास संपत आला आहे, मृग नक्षत्रही संपले. मात्र जळगावात पर्जन्यराजा बरसलेला नाही. ऊन सावलीचा खेळ सुरू झाला आहे. मधूनच काळे ढग दाटून येतात. लोकांना आता पाऊस पडेल असा आशावाद वाटायला लागतो. पण ती हुलकावणीच ठरत आहे. पावसाअभावी जिल्ह्यात पाणीटंचाईची तिव्रताही वाढतच असून आजही जिल्ह्यातील २४७ गावात २१८ टँकरने पाणीपुरवठा करण्यात येत आहे.

दुसरीकडे शेतकरी राजाही पावसाच्या प्रतीक्षेत चिंतेत आहे. जळगाव जिल्ह्यात गेल्या वर्षी अवघा ५३ टक्के पाऊस झाला होता. परिणामी नद्यांना पूर आले नाहीत, नी धरणेसुद्धा भरली नाहीत. त्याचा परिणाम तीव्र पाणीटंचाईच्या झळांनी जाणवत आहे. आजही पावसाची प्रतिक्षाच केली जात आहे. पावसाळ्याचा पहिला महिना जून व दोन नक्षत्रे



जवळपास कोरडीच गेली आहेत. जिल्ह्याच्या काही भागात मान्सूनपूर्व पावसाने वादळी हजेरी लावली खरी, परंतु त्या पावसाने फायदा नव्हे तर शेतकऱ्यांचे कोट्यवधींचे नुकसानच केले आहे.

# कराड तालुक्यातील बामणवाडीच्या उपसरपंचपदी वनिता कडव बिनविरोध

■ कराड

**तालुक्यातील** कराड-ढेबेवाडी रस्त्यावरील तारुख गावाजवळच्या बामणवाडी या आदर्श गावातील तरुण सामाजिक कार्यकर्ते आनंदराव किसन कडव यांच्या सुविद्य पत्नी वनिता कडव यांची बामणवाडी ग्रामपंचायतीच्या उपसरपंचपदी बिनविरोध निवड झाली आहे.

या निवडीवेळी सरपंच तानाजी शिरतोडे आणि ग्रामसेवक संतोष माळी यांनी निवडणूक अधिकारी म्हणून काम पाहिले. वनिता कडव यांची बिनविरोध निवड करण्यासाठी माजी सरपंच शिवाजी मोरे, पत्रकार विठ्ठल चव्हाण, मेजर कृष्णा काटेकर बापू, निवृत्ती शिबे, संपतराव काटेकर, तानाजी पवार (पोलीस उपनिरीक्षक), बबन देसाई (आदर्श शिक्षक- मुंबई), युवा उद्योजक सुधीर यादव, गिरीराज देसाई (आप्पा), भीमराव कडव, संपतराव पवार (आबा), बाळासाहेब कारंडे आणि बाळासाहेब चाळके यांच्यासह सर्व ग्रामपंचायत सदस्य, ग्रामस्थ यांनी प्रयत्न केले. गेल्या काही वर्षांपासून बामणवाडी गावाची गावातील ज्येष्ठ ग्रामस्थ आणि मुंबईनिवासी तरुण कार्यकर्त्यांच्या एकजुटीने विकासाकडे वाटचाल सुरू आहे. गावामध्ये अनेक सामाजिक उपक्रम राबवले जात आहेत. अशा या आदर्श गावाच्या उपसरपंचपदी वनिता कडव यांची बिनविरोध निवड झाल्याबद्दल ग्रामस्थ आणि विशेषतः महिलावर्गाने त्यांचे अभिनंदन केले आहे.




**नवी मुंबई महानगरपालिका**
शहर अभियंता विभाग
फेर निविदा सुचना क्र.- नमुंमपा/शहर अभियंता विभाग /84/2019-20
कामाचे नाव :- नवी मुंबई महानगरपालिकेच्या मुख्य जलवाहिनीच्या सुकापूर येथील पुलाचे तसेच बारवई व शिवकर येथील Chairs चे विशिष्ट पध्दतीने दुरूस्ती करणे
अंदाजपत्रकिय रक्कम रु. (वार्षिक) :- 3,72,49,690/-
या निविदेबाबतची विस्तृत माहिती नवी मुंबई महानगरपालिकेचे संकेतस्थळ www.nmmc.gov.in आणि www.nmmc.maharashtra.etenders.in यावर दि.24/06/2019 रोजी प्रसिध्द करण्यात आलेली आहे. संबंधीत निविदाकारांनी याची नोंद घ्यावी.
सही /-
शहर अभियंता
नवी मुंबई महानगरपालिका
जाक्र-नमुंमपा/जसं/जाहिरात/249/2019



**जाहीर सूचना**
**सूचना** याद्वारे आमचे अशील यांना देण्यात येते की, **रूपल अजय संघवी** उर्फ **रूपल प्रविण वोरा** (''**मालक**'')दिवंगत श्रीम. उर्मिला प्रविण वोरा यांचे केवळ कायदेशीर वारस यांच्याकडून खालील लिखीत अनुसूचीमध्ये अधिक विवरणीत फ्लॅट व शेअर्समधील हक्क, अधिकार व हितसंबंध खरेदी करण्याची व ताब्यात घेण्याची बोलणी करत आहेत.
कोणाही व्यक्तीस सदर फ्लॅट व शेअर्स वा कोणत्याही भागाच्या संबंधात कोणतेही दावे, मागण्या, हक्क, अधिकार वा लाभ असल्यास तसेच विक्री, हस्तांतरण, जप्ती, अदलाबदल, करार, कंत्राट, हक्क, हितसंबंध, शेअर, भाडेकरार, उप-भाडेकरार, वहिवाट, उप-वहिवाट, परवाना, गहाण, भेट, धारणाधिकार, प्रभार, अडथळे, ताबा, देणगी, न्यास, देखभाल, सुविधाधिकार, खटला, वारसा, त्याग, ताबा, लवाद, कौटुंबिक व्यवस्था, सेटलमेंट, हुकूम वा कोणत्याही न्यायालयाचा आदेश वा अन्य काही असल्यास त्यांनी याद्वारे वैध/प्रभावी दस्तावेज यांच्या सदर प्रतसह अधोहस्ताक्षरित यांना त्यांचे कार्यालय येथे सदर प्रसिद्धी तारखेपासून चौदा (१४) दिवसांच्या आत लेखी स्वरूपात सादर करणे आवश्यक आहे अन्यथा विक्री करार व फ्लॅट व शेअर्सचे हस्तांतरण आमचे अशील यांच्या नावे कोणत्याही संदर्भाविना पूर्ण करण्यात येईल व सदर दावे वा आक्षेप काही असल्यास ते अधित्यागीत मानले जातील.
**अनुसूची**
(फ्लॅट व शेअर्सचे विवरण)
फ्लॅट क्र. २३ मोजमापित ६९५ चौरस फूट (चटई क्षेत्रफळ), ८ वा मजला, बिल्डींग ''मातृ मंदिर'' म्हणून ज्ञात, मातृ मंदिर को-ऑप. हौ. सोसायटी, २७८, ताडदेव रोड, मुंबई - ४०० ००७ येथील विक्री दि. १० डिसेंबर, १९७० च्या करारानुसार शेअर प्रमाणपत्र क्र. २१५ दि. २४ डिसेंबर, १९७४ अंतर्गत जारी विभिन्न शेअर क्र. ७१ ते ७५ (दोन्ही समाविष्ट) धारक रु. ५०/- प्रत्येकीचे ५ (पाच) संपूर्ण प्रदानित शेअर्स.
मुंबई : दि. २४ जून, २०१९
२६, गोविंद बिल्डींग, २ रा मजला, १४०, प्रिंसेस स्ट्रीट, मुंबई - ४०० ००२
**पायथागोरस लीगलकरिता**
**सही**/-
(अंश देसाई)
वकील



**फॉर्म ए**
**जाहीर उद्घोषणा**
(इन्सॉल्हेन्सी अ‍ॅन्ड बॅंकरप्ट्सी बोर्ड ऑफ इंडिया (स्वैच्छिक परिसमापन प्रक्रिया) विनियमन, २०१६ च्या विनियमन ६ अंतर्गत)
**जेट एअरवेज (इंडिया) लिमिटेडच्या धनकोंचे लक्ष वेधून घेण्याकरिता**

| संबंधित तपशील | | |
| --- | --- | --- |
| १. | कॉर्पोरेट ऋणकोचे नाव : | जेट एअरवेज (इंडिया) लिमिटेड |
| २. | कॉर्पोरेट ऋणकोची संस्थापन दिनांक : | ०१.०४.१९९२ |
| ३. | प्राधिकारी ज्यांच्याअंतर्गत कॉर्पोरेट व्यक्ती संस्थापित/नोंदणीकृत आहे : | कॉर्पोरेट कामकाज मंत्रालय, आरओसी - मुंबई. |
| ४. | कॉर्पोरेट ऋणकोंचा कॉर्पोरेट आयडेंटिटी नंबर/लिमिटेड लाएबिलिटी आयडेंटिफिकेशन नंबर : | L99999MH1992PLC066213 |
| ५. | कॉर्पोरेट ऋणकोच्या नोंदणीकृत कार्यालयाचा पत्ता व प्रधान कार्यालय (काही असल्यास) : | सिरोया सेंटर, सहार एअरपोर्ट रोड, अंधेरी (पूर्व), मुंबई - ४०० ०९९. |
| ६. | कॉर्पोरेट ऋणकोंच्या संदर्भात दिवाळखोरी प्रारंभ दिनांक : | २० जून २०१९ |
| ७. | दिवाळखोरी ठराव प्रक्रिया समाप्तीची अंदाजित दिनांक : | १६ डिसेंबर २०१९ (१८० दिवस) |
| ८. | अंतरिम ठराव अधिकारी म्हणून काम करणाऱ्या इन्सॉल्व्हन्सी प्रोफेशनलचे नाव व नोंदणीकरण क्रमांक -: | **आशिष चवचारिया** **नोंदणीकरण क्र. :** IBBI/IPA-001/IP-P00294/2017-18/10538 |
| ९. | बोर्डावर नोंदणीकृत म्हणून इन्सॉल्व्हन्सी प्रोफेशनलचा पत्ता व ई-मेल : | ग्रॅन्ट थॉरन्टन, १० सी, हंगरफोर्ड स्ट्रीट, कोलकाता - ७०० ०१७. ई-मेल : ashish.chhawchharia@in.gt.com |
| १०. | अंतरिम ठराव अधिकाऱ्यासह पत्रव्यवहारासाठी वापरावयाचा पत्ता व ई-मेल | **कृपया दावे पुढील ठिकाणी सादर करावेत : आशिष चवचारिया** जेट एअरवेज (इंडिया) लिमिटेड सिरोया सेंटर, सहार एअरपोर्ट रोड, अंधेरी (पूर्व), मुंबई - ४०० ०९९.ई-मेल : rp.jetairways@in.gt.com |
| ११. | दावे सादरीकरणाची अंतिम तारीख : | ०४ जुलै २०१९ |
| १२. | अंतरिम ठराव अधिकाऱ्यांद्वारे निश्चित अनुच्छेद २१ च्या उप-अनुच्छेद (६ए) च्या कलम (बी) अंतर्गत धनकोंचा वर्ग काही असल्यास | लागू नाही. |
| १३. | वर्गामध्ये धनकोंचे अधिकृत प्रतिनिधी म्हणून काम करण्यासाठी नियुक्त परिसमापन अधिकाऱ्यांची नावे (प्रत्येक वर्गाकरिता तीन नावे) - | लागू नाही. |
| १४. | ए) संबंधित फॉर्म आणि बी) अधिकृत प्रतिनिधींचा तपशील जेथे उपलब्ध आहे | (a) https://ibbi.gov.in/home/downloads (b) लागू नाही. |

याद्वारे सूचना देण्यात येत आहे की, राष्ट्रीय कंपनी विधि न्यायाधिकरणाने दि. २० जून २०१९ रोजी जेट एअरवेज (इंडिया) लिमिटेडच्या कॉर्पोरेट दिवाळखोरी ठराव प्रक्रियेच्या प्रारंभाचा आदेश दिला आहे. (आदेश प्रत अधोहस्ताक्षरितांकडे दि. २१ जून २०१९ रोजी जारी करण्यात आली होती.)
जेट एअरवेज (इंडिया) लिमिटेडच्या धनकोंना याद्वारे निर्देश देण्यात येत आहेत की त्यांनी दि. ०४ जुलै २०१९ रोजी वा तत्पूर्वीपर्यंत वरील अ. क्र. १० मध्ये विहित पत्त्यावर अंतरिम ठराव अधिकाऱ्यांकडे त्यांचे दावे सादर करावेत.
वित्तीय धनकोंनी त्यांच्या दाव्यांचे पुरावे केवळ इलेक्ट्रॉनिक माध्यमातून सादर करावेत. अन्य सर्व धनकोंनी त्यांचे दावे पुराव्यासह व्यक्तिगत स्वरूपात टपालाद्वारे वा इलेक्ट्रॉनिक माध्यमातून सादर करावेत.
इलेक्ट्रॉनिक स्वरूपात सादरीकरणासाठी कृपया पुढील लिंकशी संपर्क साधावा http://jetairways.wcgt.in
त्याचबरोबर http://jetairways.com/insolvencyproceedings च्या माध्यमातूनही सदर लिंक प्राप्त करता येऊ शकेल.
परिसमापन प्रारंभ दिनांकानुसार अधिकृत विनिमय दरानुसार विदेशी चलनातील मूल्याचे दावे भारतीय चलन मूल्यात गणले जातील.
चुकीचे, दिशाभूल करणारे दावे सादर केल्यास दंड होऊ शकेल.
सही/-
आशिष चवचारिया
अंतरिम ठराव अधिकारी
दिनांक : २४ जून २०१९
ठिकाण : मुंबई


# बेमुदत उपोषण करणाऱ्या पत्रकाराची प्रकृती खालावली

■ रत्नागिरी, प्रतिनिधी

**खेडमध्ये** पत्रकारांचे २० जूनपासून बेमुदत उपोषण सुरू आहे. आज उपोषणाच्या चौथ्या दिवशी उपोषणकर्ते पत्रकार अनुज जोशी यांची प्रकृती खालावल्याने त्यांना कळंबणी उपजिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले.

खेड येथील पत्रकारांना मारहाण प्रकरण तसेच येथील पोलीस प्रशासनाच्या विरोधात २० जूनपासून जिल्ह्यातील पत्रकारांनी खेडमध्ये प्रांताधिकारी कार्यालयासमोर उपोषण सुरू केले आहे. गेले चार दिवस हे उपोषण सुरू असून अद्याप कोणताही तोडगा यावर निघालेला नाही. दरम्यान उपोषणाच्या चौथ्या दिवशी आज सायंकाळी उपोषणकर्ते पत्रकार अनुज जोशी यांची प्रकृती खालावल्याने त्यांना तातडीने कळंबणी उपजिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. पत्रकाराची प्रकृती बिघडल्याने प्रशासनाविरोधात नाराजी व्यक्त करण्यात येत आहे.

# शिरूर तालुक्यात मिळणार आता घरपोच शिधापत्रिका

**कवठे येमाई, प्रतिनिधी-** शिरूर तालुक्यात नव्याने शिधापत्रिका मिळण्यासाठी शिरूर तहसीलदार कार्यालयाकडे योग्य त्या कागदपत्रांसह अर्ज सादर केलेल्या नागरिकांना आता घरपोच शिधा पत्रिका मिळणार असून शिरूरचे कार्यक्षम तहसीलदार गुरु बिराजदार यांनी तालुक्यातून नव्याने शिधापत्रिका मिळण्यासाठी अर्ज सादर केलेल्या नागरिकांना त्यांनी सादर केलेल्या कागदपत्रांची योग्य ती शहानिशा करून विनाविलंब शिधापत्रिका घरपोच देण्यात येणार असल्याचे सांगितले. तहसीलदार बिराजदार यांनी घरपोच शिधापत्रिका देण्याचा उपक्रम सुरु केल्याने नागरिकांना होत असलेला नाहक त्रास, तालुक्याच्या ठिकाणी फक्त या कामासाठी घालावे लागणारे हेलपाटे व सर्वसामान्यांच्या पैशांचा होणारा अपव्यय थांबणार आहे.

# वीज पडून तरूणाचा मृत्यू

**पुणे-** येथील शिरूर तालुक्यात वीज पडल्याने तरुणाचा जागीच मृत्यू झाल्याची घटना घडली आहे. अक्षय पवार (२१) असे या तरुणाचे नाव आहे. शेतातील काम करून घरी जाताना वीज कोसळल्याने अक्षयचा मृत्यू झाला. या घटनेने परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे.


बृहन्मुंबई महानगरपालिका
**जिल्हाधिकारी मुंबई उपनगर जिल्हा यांचेकडून**
**-: शुध्दीपत्रक :-**
महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६, क्रमांक-उपजिभूक्र.४/भूसं/एलएक्यू/एसआर/२५५/मुंउजि/२०१८ दिनांक-२७ जुलै, २०१८ महाराष्ट्र शासन राजपत्र,भाग एक-कोकण विभागीय पुरवणीचे पृष्ठ क्र. २४ वर मा.जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर जिल्हा यांचेकडून प्रसिध्द झालेल्या दिनांक २,ऑगस्ट,२०१८ च्या अधिसूचनेमध्ये संयुक्त मोजणीप्रमाणे क्षेत्रामध्ये दुरुस्ती खालील प्रमाणे वाचावी.
**गांव- सहार** **तालुका- अंधेरी**

| करीता | | | वाचा | | |
| --- | --- | --- | --- | --- | --- |
| अ.क्र. | न.भू.क्र. | क्षेत्र (चौ.मी) | अ.क्र. | न.भू.क्र. | क्षेत्र (चौ.मी) |
| (१) | (२) | (३) | (१) | (२) | (३) |
| १. | २९५ पै | ८३५.०० | १. | २९५,२९५/१ ते ३ | ७३८.२० |
| एकूण | | ८३५.०० | एकूण | | ७३८.२० |

**प्रयोजक : ''उद्यान'' या प्रयोजनासाठी भूसंपादन.**
**वांद्रे, मुंबई**
**दिनांक : १५/०५/२०१९**
सही/-
(सचिन कुर्वे)
जिल्हाधिकारी,
मुंबई उपनगर जिल्हा
पीआरओ/९४५/जाहि./२०१८/शुद्धी./२०१९-२०
पातळ प्लास्टिक पिशवी म्हणजे माणसाचा शत्रू, तिचा वापर टाळावा